POSHAN Abhiyaan
PM's Overarching Scheme for Holistic Nourishment
सही पोषण - देश रोशन

# बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) नाशिक जि. नाशिक

सिल्वरमुन,प्लॅट नं-१,ड्रिमसिटीजवळ, ड्रिमकॉर्नर,सहकारनगर,रामदासस्वामीमार्ग,नाशिक-४२२००६
फोन नं.०२५३-२४१३१८२, Email : ncdponashik@yahoo.com

---

जा.क्र.बाविप्रअ(ना)जि.नाशिक/अंम/रिपभ/जाहि/ **२३३** /२०२६-२७ नाशिक दिनांक : १६/०७/२०२६

## अंगणवाडी मदतनीस रिक्त पदे भरती - २०२६ जाहिरात सुचना

महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-एबावि-२०२२ / प्र.क्र.९४/ का-६ दि.०२ फेब्रुवारी २०२३ व दि. ३० जानेवारी २०२५ नुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) नाशिक, जि.नाशिक या कार्यालयाचे प्रकल्प क्षेत्रातील अनुक्रमे **नगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत** असलेल्या **कळवण, सुरगाणा, दिंडोरी, देवळा, नांदगांव, त्र्यंबकेश्वर, ईगतपूरी** या शहरातील अंगणवाडी केंद्रातील मदतनीसांची (०८ पदे ) सरळ नियुक्तीने (By Nomination) भरण्यासाठी पात्र स्थानिक रहिवाशी असलेल्या महिला उमेदवारांकडून **दि. २०.०७.२०२६ ते दि. ३१.०७.२०२६** पर्यत या कालावधीत विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

अंगणवाडी सेविका/ मदतनीस या मानधनी पदाच्या सरळ नियुक्तीसंदर्भात आवश्यक शैक्षणिक पात्रता, अटी व शर्ती, रिक्त पदांची अंगणवाडी ठिकाणासह माहिती व रिक्त पद संख्या, अर्जाचा विहीत नमुना, इत्यादी सर्व माहिती हि **https://nashik.gov.in/notice_category/recruitment-en/** या संकेतस्थळावर पदे भरतीची सुचना व माहिती प्रसिध्द करण्यात आली आहे. पात्र उमेदवारांनी सेविका/ मदतनीसांचे रिक्त पदासाठी वरील पत्यावर विहीत मुदतीत व नमुन्यात कागदपत्रासह अर्ज करावे अशी सुचना करण्यात येत आहे.

**जा.क्र.बाविप्रअ(ना)मा/आस्था/अंम/रिक्तपदेभरती/ २३३ /२०२६-२७.**
दिनांक : १६/०७/२०२६.

१६/७/२०२६

**बाल विकास प्रकल्प अधिकारी,**
(नागरी) जि.नाशिक

POSHAN Abhiyaan
PM's Overarching Scheme for Holistic Nourishment
सही पोषण - देश रोशन

# बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) नाशिक जि. नाशिक

सिल्वरमुन,प्लॅट नं-१,ड्रिमसिटीजवळ, ड्रिमकॉर्नर,सहकारनगर,रामदासस्वामीमार्ग,नाशिक-४२२००६
फोन नं.०२५३-२४१३१८२, Email : ncdponashik@yahoo.com

## नागरी प्रकल्पातील अंगणवाडी मदतनीस रिक्त पदे भरती जाहिरात-२०२६

एकात्मिक बाल विकास सेवा योजना,अंतर्गत **बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) नाशिक जिल्हा** यांचे अधिनस्त अंगणवाडी सेविका व मदतनिस यांची रिक्त पदे भरती करण्यासाठी नगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत क्षेत्र असलेल्या त्या शहरातील नागरी प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रातील जाहिरातीमध्ये नमूद रिक्त पदांवर एकत्रित मानधनी तत्त्वावर निवडीसाठी सरळ नियुक्तीने (By Nomination) भरण्यासाठी रिक्त पद असलेल्या शहरातील स्थानिक रहीवाशी असलेल्या पात्र महिला उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीनुसार विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

**रिक्त पदांची माहिती -**

| अ.क्र | न.प./ न.पा. चे नाव | अंगणवाडी केंद्राचे ठिकाण | रिक्त पदांची संख्या | |
|---|---|---|---|---|
| | | | सेविका | मदतनीस |
| १. | कळवण | सब स्टेशन कळवण | ० | ०१ |
| २. | ईगतपूरी | डॉ आंबेडकर नगर ईगतपुरी | ० | ०१ |
| ३. | देवळा | देवळा ५ अंगणवाडी | ० | ०१ |
| ४. | सुरगाणा | दवाखानापाडा सुरगाणा | ० | ०१ |
| ५. | दिंडोरी | बदादे वस्ती दिंडोरी | ० | ०१ |
| ६. | नांदगाव | आनंद नगर व जुना पॉवर हाऊस नांदगाव | ० | ०२ |
| ७. | त्र्यंबकेश्वर | इदिरा नगर त्र्यंबकेश्वर | ० | ०१ |
| | | **एकुण** | **०** | **०८** |

**अटी व शर्ती :**

१. **शैक्षणिक पात्रता :-** अंगणवाडी सेविका आणि मदतनिस पदासाठी इयत्ता **१२ वी उत्तीर्ण** (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष) अशी किमान शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे.

२. **वास्तव्याची (स्थानिक रहिवाशी असणे) अट** :- उमेदवार महिला स्थानिक रहिवाशी असावी. स्थानिक रहिवाशी म्हणजेच ज्या शहरातील अंगणवाडी मदतनिस पदासाठी अर्ज केलेला असेल त्याच शहरातील (नगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत क्षेत्रातील) रहिवाशी असणे आवश्यक आहे. यासाठी रहिवाशी दाखला म्हणुन शासकिय दस्तऐवज (जसे : आधारकार्ड / मतदान ओळखपत्र / तहसिलदार/वार्ड अधिकारी यांचा रहीवाशी दाखला इ.सर्व) जोडणे आवश्यक आहे.

३. **वयाची अट व पुरावा :-** अंगणवाडी सेविका, मदतनिस या पदासाठी वयोमर्यादा किमान १८ वर्षे व कमाल ३५ वर्षे राहिल. तथापि विधवा उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा ४० वर्षे राहिल. वयाचा पुरवा म्हणुन शाळा सोडल्याचा दाखला / १० वी उत्तीर्ण बोर्डाचे प्रमाणपत्र /जन्म नोंद दाखल्याची सत्यप्रत जोडणे आवश्यक राहील. उमेदवाराचे किमान व कमाल वय हे जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास गणण्यात येईल.

४. **लहान कुटुंब :-** लहान कुटुंबाकरीता दि.२७/०२/२०२४ चा शासन निर्णय लागु राहील वरील पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांस लहान कुटुंबाची अट लागु राहिल. उमेदवारांस दोन पेक्षा जास्त हयात अपत्ये (दत्तक दिलेल्या

अपत्यांसह) नसावीत. अर्जासोबत दिलेल्या नमुन्यात लहान कुटुंबा बाबतचे प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक राहिल. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

५. **मराठी भाषेचे ज्ञान :-** मदतनिस रिक्त पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. उमेदवाराने नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.

६. **उमेदवार विधवा असल्यास :-** पतीचे मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र जोडावे.

७. **उमेदवार अनाथ असल्यास :-** संबंधित विभागीय उप-आयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांचे कडील प्रमाणपत्र जोडावे.

८. **मागासवर्गीय असल्यास :-** अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती/ इतर मागास प्रवर्ग/ विमुक्त जाती / भटक्या जमाती/ आर्थिक दृष्टया दुर्बल घटक/ विशेष मागास प्रवर्ग/ सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास वर्ग असल्यास सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या जातीच्या / प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

९. **अनुभव :-** उमेदवारास शासन यंत्रणेतील अंगणवाडी मदतनिस म्हणुन कामाचा किमान दोन वर्षाचा अनुभव असल्याशिवाय अनुभवासाठी असलेले गुण देण्यात येणार नाहीत. असा अनुभव उमेदवारांस असल्यास त्याबाबतचे सक्षम अधिका-याचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. मान्यता प्राप्त खाजगी व स्वयंसेवी, अनुदानित / विना अनुदानित संस्थेतील कामाचा अनुभव ग्राहय धरला जाणार नाही व याबाबतचा कोणताही युक्तिवाद उमेदवाराने केल्यास अपात्र ठरविण्यात येईल.

१०. उमेदवाराने अर्जामध्ये नगरपालिका / नगरपचायत/ नगरपरिषद असलेल्या शहराचे नांवाचा उल्लेख करावा.

११. **एका उमेदवाराने एका पदासाठी एकच अर्ज** सादर करावा. उमेदवाराने **एका पदासाठी** वेगवेगळे अर्ज सादर केल्यास एकच अर्ज विचारात घेण्यात येईल व त्याबाबत उमेदवाराशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१२. शहराचे नांव, अंगणवाडी ठिकाणाचे नाव व पदाचे नांव नमुद केलेले नसणे, अर्ज अपुर्ण भरलेला असणे, खाडाखोड असणे, उमेदवाराची विहित ठिकाणी स्वाक्षरी नसणे तसेच अर्जाच्या सोबत आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या छायांकित व साक्षांकित प्रती नसणे इ.कारणांमुळे अर्ज अपात्र ठरविण्यात येतील व त्यासंबंधी उमेदवारांस कळविण्यात येणार नाही.

१३. **अंतिम दिनांकानंतर** (दि. ३१.०७.२०२६ नंतर) आलेल्या किंवा डाकेने (पोष्टामुळे) विलंब झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

१४. **निवड कार्यपध्दती :-** महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का-६, दिनांक ३०.०१.२०२५ च्या परिशिष्ट नुसार उमेदवारांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन इयत्ता १२वी/ पदवीधर /पदव्युत्तर/ डिएड /बीएड /संगणक परिक्षा/ विधवा/ अनाथ/ अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती/ इतर मागास प्रवर्ग/ विमुक्त जाती / भटक्या जमाती/ आर्थिक दृष्टया दुर्बल घटक/ विशेष मागास प्रवर्ग/ सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास वर्ग/ अंगणवाडी सेविका/ मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका म्हणुन कमीत कमी २ वर्षांचा अनुभव या बाबींच्या आधारे गुण दिले जाणार आहे. उमेदवारास मिळालेल्या एकुण गुणांनुसार गुणानुक्रमाने पात्र उमेदवारांची शहरातील रिक्त पदांच्या संख्येनुसार निवड करण्यात येईल. या पदांकरीता लेखी परिक्षा अथवा मुलाखत घेतली जाणार नाही. अर्जा सोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांनुसार शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे उमेदवारांना गुण देऊन प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल. त्यावर अर्ज करणा-या उमेदवारांना आक्षेप / तक्रार असल्यास अर्ज केलेल्या उमेदवारांनी १० दिवसांचे आंत लेखी तक्रार बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) जि.नाशिक कार्यालयाकडे सादर करावी. सदर तक्रारींची शहानिशा करुन अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल. निवड प्रकियाचे वेळापत्रक यासोबत देण्यात आले आहे.

१५. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात / किंवा अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती सदर प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर किंवा निवड झाल्यानंतरही रद्द करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्ती वेळी मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहिल, अन्यथा निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

१६. एखादया उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष /अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यांस निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

१७. अंगणवाडी सेविका/ मदतनिस यांना शासकिय नियमानुसार एकत्रित मानधन देय राहील, शासनाने वेळोवळी करण्यात आलेली वाढ नियमानुसार अनुज्ञेय राहिल. मात्र मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते सवलती अनुज्ञेय नाही. अंगणवाडी सेविका / मदतनीस हे एकत्रित मानधनावरील कायम मानधनी स्वरुपाचे पद आहे.

१८. संबंधित शहरातील अंतिम निवड यादी जाहिर झाल्यानंतर गुणानुक्रमे सेविका/ मदतनिस यांची निवड करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांना त्या-त्या शहरातील कोणत्याही अंगणवाडी केंद्रावर काम करावे लागेल. उमेदवाराची एकदा नियुक्ती झाल्यावर कोणत्याही परिस्थितीत त्यांची इतर ठिकाणी बदली करता येणार नाही, तसेच त्यांचे निवासस्थानापासुन नियुक्ती देण्यात आलेल्या ठिकाणापर्यंत कोणताही प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही. त्याचप्रमाणे नियुक्ती झालेल्या ठिकाणी सतत गैरहजर राहिल्यास त्यांची नियुक्ती खंडीत करणेत येईल.

१९. **प्रतिक्षा यादी :** एकुण प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारावर उमेदवारांची प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल. काही कारणामुळे उमेदवार नियुक्ती आदेशाच्या दिनाकांपासुन ३० दिवसांत रुजु न झाल्यास किंवा त्यांस अपात्र ठरविण्यात आल्यास प्रतिक्षा यादीतील गुणानुक्रमानुसार पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल व सदर क्षेत्रात कोणत्याही कारणास्तव पद रिक्त झाल्यास अथवा नविन पद निर्मिती झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांस गुणानुक्रमे नियुक्ती देण्यात येईल. सदर प्रतिक्षा यादी निकाल जाहीर झाल्यापासुन एक वर्ष वैध राहिल.

२०. **अपिल:मदतनिस** या पदावरील घोषित निवडी संदर्भात कोणत्याही उमेदवाराची तक्रार असल्यास निवड यादी घोषित झाल्यापासुन ३० दिवसांचे आंत विभागीय उप-आयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे तक्रार करता येईल व मा.विभागीय उप-आयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग, नाशिक यांनी दिलेल्या निर्णयामुळे तक्रारदाराचे समाधान झाले नसल्यास मा.आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचेकडे पुढील ६० दिवसांत अपिल दाखल करता येईल.

२१. **सेवा समाप्तीसाठी वयाची अट :** नियुक्त होणा-या अंगणवाडी सेविका / मदतनीस यांना दि.१३ डिसेंबर २०२३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे सेवानिवृत्तीचा दिनांक निश्चित केलेला आहे. तसेच अंगणवाडी सेविका/ मदतनिस यांची सेवा वयाची ६० वर्षे पुर्ण होईपर्यंत किंवा त्या शारीरिक दृष्टया काम करण्यास सक्षम नसल्यास यापैकी जे आधी घडेल तोपर्यंतच सुरु ठेवण्यात येईल.

२२. जाहिरातीमधील कोणत्याही मुद्दयाबाबत साशंकता अगर संदिग्धता निर्माण झाल्यास दि.२/०२/२०२३, दि.११/०८/२०२३, दि.१३/१२/२०२३, दि.२७/०२/२०२४, दि.३०/०१/२०२५ रोजीच्या महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णयातील तरतुदी अंतिम राहतील.

२३. **पत्रव्यवहार :-** भरती प्रक्रियेसंबंधी अर्जदारांस कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सर्व सुचना जाहिरातीमधील अटी व शर्तीप्रमाणे असुन वेळोवेळी देण्यात येणा-या सुचना कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येतील.

२४. **महत्त्वाची सुचना :-** सदर भरती प्रक्रिया उपरोक्त शासन निर्णय दि.०२.०२.२०२३ व दि ३०.०१.२०२५ अन्वये राबविण्यात येणार असुन नियुक्ती गुणवत्ता यादीनुसार करण्यात येणार आहे. करीता उमेदवारांनी कोणत्याही भुलथापांना अथवा अफवांना बळी पडू नये.

२५. **अर्ज सादर करण्याचा पत्ता** :- बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) जि.नाशिक यांचे कार्यालय, सिल्वरमुन,फ्लॅट नं-१, ड्रिमसिटीजवळ, सहकारनगर, रामदास स्वामी मार्ग, नाशिक-४२२००६ दुरध्वनी क्रमांक ०२५३-२४१३१८२.

२६. **भरती प्रक्रिया वेळापत्रक :-**

| अ.क्र. | बाब | शासन निर्णयातील कालावधी | नियोजित करण्यात आलेला दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | अंगणवाडी सेविका व मदतनीस पदांसाठी जाहिरात देवून उमेदवारांचे अर्ज मागविणे | जाहिरात प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासुन १० दिवस | २०/०७/२०२६ ते ३१/०७/२०२६ | शासकीय सुटीचे दिवस वगळुन |
| २. | प्राप्त अर्जाची छाननी आणि प्राथमिक यादी तयार करणे (परिशिष्ट अ नुसार गुण देवून) | अर्ज प्राप्त करण्याच्या अंतिम तारखेनंतर ५ दिवसात | ०३/०८/२०२६ ते ०७/०८/२०२६ | |
| ३. | गुणवत्ता यादीस पडताळणी समितीची मान्यता घेणे (परिशिष्ट ब मधील तक्त्याप्रमाणे नोटीस बोर्डवर प्रसिध्दी करणे) | गुणवत्ता यादी परिशिष्ट अ नुसार गुण देवून प्रसिध्द केल्यानंतर पुढील ३ दिवसात | १०/०८/२०२६ ते १२/०८/२०२६ | |
| ४. | नोटीस बोर्ड वरील प्रसिध्द यादीतील उमेदवाराबाबत हरकती/ आक्षेप/ तक्रारीबाबत शहानिशा करून गुणवत्ता यादीत सुधारणा करणे | यादी घोषित केल्याच्या दिनांकापासुन १० दिवसांच्या आत | १३/०८/२०२६ ते २६/०८/२०२६ | |
| ५. | अंतिम यादीमधील भरावयाच्या पदासाठी गुणानुक्रमानुसार उमेदवाराची निवड करणे व नियुक्ती पत्र निर्गमित करणे. | अंतिम यादी प्रसिध्द केल्यानंतर | २७/०८/२०२६ | |

**ठिकाण :** नाशिक.
**दिनांक :** १६.०७.२०२६

१६/०७/२०२६

बाल विकास प्रकल्प अधिकारी,
(नागरी) जि.नाशिक.

# अंगणवाडी सेविका/ मदतनिस पदासाठी अर्जाचा विहित नमुना

प्रति,

**मा.बाल विकास प्रकल्प अधिकारी,**
(नागरी) नाशिक जिल्हा.

| |
|---|
| उमेदवाराचा पासपोर्ट साईज फोटो |
| **स्वाक्षरी** |

मी खाली सही करणार -------------------- या शहरातील स्थानिक रहिवाशी असुन आपल्या प्रकल्पातील **अंगणवाडी ------------------ या पदासाठी** अर्ज सादर करीत आहे. त्यासाठी माझी माहिती खालीलप्रमाणे आहे.

१ अर्जदाराचे नांव (कागदपत्रावरील) :- कु./श्रीमती.----------------------------------------

२ विवाहित / अविवाहित :- ---------------------------------------------------

३ विवाहानंतरचे नांव :- सौ.------------------------------------------------

४ संपुर्ण पत्ता :- ---------------------------------------------------
---------------------------------------------------
---------------------भ्रमणध्वनी क्रमांक ------------

५ जन्मतारीख :- / /

६ जाहिरात प्रसिध्दीचे दिनांकांस वय :- ---------वर्षे-----------महिने-------------दिवस

७ मागासवर्गीय आहे काय ? :- होय / नाही

८ असल्यास प्रवर्ग व प्रमाणपत्र जोडावे :- अ.जा.( ) / अ.ज. ( )/ इ.मा.व.( )/ वि.जा.( ) / भ.ज.( )/ वि.मा.व.( )/ आर्थिक दृष्टया दुर्बल घटक ( )/ सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास ( )

९ धर्म :-------------------- ९अ जात / पोटजात :- --------------

१० उमेदवार स्थानिक रहिवाशी आहे का :- होय / नाही

११ विधवा आहे काय ?---------------- १२. अनाथ आहे काय ?----------------------

१३. हयात असलेल्या अपत्यांची संख्या :- मुले --------, मुली-------- , एकुण अपत्ये -------

१४. शैक्षणिक अर्हता :- (**अंगणवाडी** सेविका/ मदतनिस पदासाठी किमान इयत्ता **१२ वी उत्तीर्ण आवश्यक आहे** .)

| क्र. | शिक्षण | उत्तीर्ण वर्ष | शाळेचे/बोर्डाचे/ विद्यापिठाचे नांव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | **इयत्ता बारावी** | | | | |
| ०२ | **पदवीधर** | | | | |
| ०३ | **पदव्युत्तर** | | | | |
| ०४ | **डी.एड** | | | | |
| ०५ | **बी.एड** | | | | |
| ०६ | **संगणक परिक्षा/ समकक्ष** | | | | |
| ०७ | **इतर** | | | | |

१५) **अनुभव असल्यास अनुभवाचा तपशिल :-**

| शासनमान्य अंगणवाडीचे नांव व पत्ता | पद | अनुभव कालावधी (पासुन-पर्यंत) |
|---|---|---|
| | | |

१६ ) **अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी :-**

| | |
|---|---|
| १. | २. |
| ३. | ४. |
| ५. | ६ |
| ७. | ८. |
| ९. | १०. |
| ११. | १२. |

वरीलप्रमाणे दिलेली माहिती खरी असुन खोटी/चुकीची आढळल्यास माझा अर्ज बाद करण्यात येईल किंवा माझी निवड/नियुक्ती झाल्यानंतरही माझी निवड/नियुक्ती रद्द करण्यात येईल व त्यांस माझी काहीही हरकत नसेल व नियमानुसार कारवाईस मी पात्र ठरेल, याची मला पुर्ण जाणीव आहे. तसेच जाहिरातीत नमुद अटी व शर्ती मी पुर्णपणे वाचलेल्या असुन त्या सर्व मला मान्य आहेत.

ठिकाण :

दिनांक : / ०७/२०२६ **(उमेदवाराचे नांव व सही)**

## लहाण कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र

मी श्रीमती ------------------------------------------------------------------------श्री /श्रीमती -------------------

-------------------------- यांची मुलगी / पत्नी वय--------------वर्षे राहणार----------------------------------------------

---------------------------------याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करते की,

(१) मी **अंगणवाडी सेविका/ मदतनिस** या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
(२) आज रोजी मला खालीलप्रमाणे हयात मुले/मुली आहेत.

| **अ.क्र.** | **अपत्याचे नांव** | **स्त्री/पुरुष** | **जन्मतारीख** |
|---|---|---|---|
| ०१ | | | |
| ०२ | | | |
| ०३ | | | |
| ०४ | | | |

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल, किंवा भविष्यात दोन पेक्षा अधिक मुले झाल्यास, मानधनी पदासाठी मी अनर्ह/अपात्र ठरविण्यास किंवा कमी करण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.
(४) मला दोनपेक्षा जास्त मुले होणार नाहीत यासाठी मी कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करुन घेण्याची प्रतिज्ञा करते.

ठिकाण :

दिनांक : /०७/२०२६

**(उमेदवाराचे नांव व सही)**